म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
वा. नं. ९३८३
९८५४



REFBK-0008369
REFBK-0008369

# उर्मिला

कृ. ब. निकुम्ब

# उ र्मि ला

[ निवडक कवितांचा संग्रह ]

REFBK-0008369
REFBK-0008369

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

कृष्ण बलवन्त निकुम्ब.

स्वाति-प्रकाशन. मूल्य अडीच रुपये.

सर्वाधिकार लेखकाधीन.
प्रथमावृत्ति १९५४.

मुखपृष्ठ :
‘ प्रतिभा ॲडव्हरटायझिंग, ’
नाशिक.

प्रकाशक : बी. बी. कुरणे,
‘ स्वाति-प्रकाशन, ’
‘ वसंत-विहार ’ बुक डेपो,
बेळगांव.

मुद्रक : जी. के. कुट्रे,
‘ राजकमल ’ प्रिंटिंग प्रेस,
बेळगांव.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

ती. बाईस–

## पान-सांखळी

| | | |
|---|---|---|
| १ | आलं उम्बराला फूल | १ |
| २ | नवलाची पहांट | २ |
| ३ | वर्षा ! | ३ |
| ४ | कृतज्ञ | ७ |
| ५ | स्नेह मी जागवीन आपुला ! | ८ |
| ६ | या दिनाल्तीं– | ९ |
| ७ | भर रस्त्यावर– | १० |
| ८ | माझिया भोंवतीं– | ११ |
| ९ | डोळे तुझे बदामी ! | १३ |
| १० | सल | १४ |
| ११ | अधुरें गीत | १५ |

| | |
|---|---|
| १२ प्रीतीच्या पांखरा ! | १६ |
| १३ उशीर | १९ |
| १४ नवें प्रलोभन | २० |
| १५ ओळख | २१ |
| १६ अडसर | २२ |
| १७ मूक प्रीति ही– | २३ |
| १८ नांव | २४ |
| १९ व्यथा मनांतिल– | २५ |
| २० मुका मार | २६ |
| २१ रहस्य | २७ |
| २२ अजूनहि कधीं | २८ |
| २३ चूक | २९ |
| २४ त्या निवान्त रस्त्यावरती– | ३० |
| २५ या ताराङ्कित | ३१ |
| २६ तुझ्या रुसण्याची रीत | ३२ |
| २७ या विश्वसागरावर | ३३ |
| २८ तुझ्या हास्यांतून | ३४ |
| २९ भूल | ३५ |
| ३० आसूड | ३७ |
| ३१ निघतांना | ३८ |
| ३२ संहारचक्र | ३९ |
| ३३ सिद्ध व्हायचें हांसून | ४० |
| ३४ हीं सौंदर्यें– | ४१ |
| ३५ नियति | ४३ |
| ३६ जीवन ! जीवन ! | ४४ |
| ३७ माझें बकुळीचें जग | ४७ |
| ३८ मत्स्यावतार | ४८ |
| ३९ भूपाळी | ४९ |
| ४० दुपार | ५० |

४१ ओसरलें वादळ ५१
४२ पावसाळी हवा ५३
४३ कातरवेळेस ५४
४४ कळ ५५
४५ साञ्ज ५६
४६ वाट ५७
४७ प्रक्षुब्ध गर्जतो- ५९
४८ गुपित ६०
४९ मोगरा ६१
५० पांखरा ! ६३
५१ सूर्यफुलापरि- ६५
५२ रे स्वच्छन्द मना ! ६६
५३ बन्द दालनें. ६७
५४ ३० जानेवारी १९४८ ६९
५५ बान्ध केव्हां फुटणार ? ७०
५६ मीहि न कां झुञ्जार ? ७१
५७ अन्तरींच्या स्वप्नपुष्पा ७३
५८ पूर्तता ७४
५९ हे स्वप्नांचे पाश- ७५
६० मागोवा ७७
६१ सत्य आज मे बरीं ८०
६२ सख्यांनो ! ८१
६३ उष्टावतां पान ८२
६४ ईश्वराचें मनोगत ८३
६५ प्रिय गगना ! ८५
६६ या माझ्या शब्दांत- ८६
६७ उर्मिले ! ८७

उर्मिला

अनुक्रम 92430
विभाग 3104
क्रमांक 9363
नों. दि. 29/8/74

# आलं उम्बराला फूल !

उम्बराला फूल—आलं—उम्बराला फूल
बाई—उम्बराला फूल

घरीं-दारीं, अङ्गणांत
थेट काना-कोंपऱ्यांत
सुगन्धाचे गोड झोत
दर्वळून गेलं माझं अन्तर मळूल !

आली तपस्या फळास
उभा प्रत्यक्षीं आभास
मूर्त झाला निदिध्यास
प्रभुराय अवचित झाले अनुकूल !

करा जयजयकार करा
वांटा गांवांत साखरा—
फूल ये माझ्या उम्बरा
अमृत हें ओती माझं ‘ वेडपी ’चं ‘ खूळ ’ !

—आतां इथून जीवनीं
नित्य प्रकाशाचीं गाणीं
सम्पे तमाची कहाणी
सार्थकाच्या माहेरींचं आलं मला मूळ !
बाई, उम्बराला फूल !

# नवलाची पहांट.

नवलाची ही पहांट–येई हर्षानें मम जीव फुलून्
अनोळखी तरि वेधक घाली भावुक शीळ कुणी जवळून् !

सम्पुन गेली रात-विराणी
ढळलें हो ताऱ्यांचें पाणी
जळत्या मोहाचे क्षण सरत्या रात्रिसवें गेलेत विझून् !

पूर्वेला केशर-वेलींवर
तुऱ्यातुऱ्यांचा प्रणय मनोहर
त्यांत राहिले मम हृदयींचे अवघे रम्य तरङ्ग झुलत्.

मनोरथांतुन गुङ्गत-रङ्गत
वायु फिरे होउन रोमाञ्चित
आठवणींचा परिमळ जाई नकळत अन्तर दरवळून् !

स्फुरती नूतन मन्त्र अचानक !
अन्तर तर हें होउन उत्सुक–
वाट पाहतें ! उगीच ?–परि तें सुखवी संवेदन उमलून् !

मार्तण्डाचा तों आला रथ
तेजाचा संदेश पुकारित
प्रकाश-रेखा उज्ज्वल शिरली हृदयीं जीवन झळझळवून्.
नवलाची ही पहांट–येई हर्षानें मम जीव फुलून् !

# वर्षा !

येई वर्षादेवी !
विजेचें नर्तन, मेघांचें गर्जन,
मृद्‌गन्ध, विशाल समृद्ध शेतें,
अमृतवर्षाव सांगातीं घेऊन
हिरवा आपुला शृङ्‌गार लेऊन
येई वर्षादेवी !

" वसन्त ! वसन्त ! ऋतुराज ! श्रेष्ठ ! "
म्हणत नाचलों
आजपर्यंत
आम्ही वेडे कवि
परम्परेचे अन्धपूजक !
संकेतांचे बळी !
करून घेतली वंचना स्वतांची
जाणूनबुजून !
आणिक घडलें जनवंचनही
हातून आमुच्या !
हे वर्षादेवी !
आम्हीच कारण तुझ्या उपेक्षेला !
—गुन्हेगार आम्ही !
क्षमस्व ! क्षमस्व !

आजपर्यंत
कधींच नव्हतें ऐकलें काय ?
आम्हीं तें तुझें
जीवनदायी घनगर्जित ?
तरीहि आम्ही म्हणत राहिलों :
" कुहू....कुहू....कुहू....
कुहू....कुहू....कुहू....
पंचम गोड तो ! "

काळ्या मेघांवर आरूढ होऊन
मृगदेवानें
टाकिली जेधवां पहिली चूळ
नव्या अमृताची
—थरारून गेली ' गन्धवती पृथ्वी '
आणिक सोडिले
सहर्ष तियेनें सुगन्धी निःश्वास
कृतकृत्यतेचे !
समाधानाचे !
कितिकदां तरी सेविला होता
आम्हीं तो सुगन्ध
—आगामी समृद्ध, तृप्त जीवनाचा
अग्रगामी दूत !
तरीहि गातच राहिलों गायनें
आम्ही वासन्तिक पुष्पसंभाराचीं,
परिमळाचीं !

तुझें संजीवक
पाचूंचें वैभव
नित्य पाहूनहि

आम्हीं उभविलीं गुढ्यातोरणें
चैत्रपालवीचीं
आणि स्वप्राणानें
हर्षनाद केला :
" वसन्त आला ! "

भरूनी जीवन आकाशपात्रांत
सहस्रधारांनीं
आरंभिला तूं अभिषेक जेव्हां
प्रतिमेवरती वसुन्धरेच्या—
तीर्थजलानें त्या
सरिता, ओहळ ओसण्डूं लागले
विजयोर्मींपरी यौवनांतल्या !
दुर्दम्य, जिवन्त, भव्य आकांक्षांचें
तसलें प्रतीक नित्य पाहूनहि
मोहिनी मात्र पडली आम्हां
सन्थ वासन्तिक पुष्करिणींची !

जीवनदेवते !
जाणीव आज हो आमुच्या गुन्ह्याची
क्षमस्व ! क्षमस्व !
' वसन्त, वसन्त ! ' म्हणून तेव्हां
कलाविलासाचा केला बडिवार
' जीवन–कले 'ची प्रतीति मात्र
तुझ्या रूपांतून लाभते आज !
येथून आम्ही
सदैव पुजूं
तुझीच–तुझीच समृद्ध कूस !
उमजलें आतां तूंच अन्नपूर्णा !

येई अन्नपूर्णे !
उदात्त भावांनीं भरून गेलेल्या हृदयापरी
भरून येऊं दे आकाशाचा ऊर
मन्थर, सजल मेघमालिकांनीं
वीर पुरुषाच्या
दीप्त, उर्जस्वल जयध्वनीपरी कडाडूं दे वीज !
सर्वत्र वर्षूं दे अमृताच्या धारा !
चौफेर सुटूं दे मातीचा सुवास
वाहूं दे जीवन नद्यांत दुथडी
भिडवीं क्षितिजा विनम्र शेतें
अनन्त, सतेज, हिरव्या छटांनीं
निववी डोळे !
इकडे तिकडे
चोहींकडे फुलो
उदण्ड, अमूप समृद्धि केवळ !

होतांच समूर्त वरदान तुझें
गहींवर उरीं दाटून जन
तुजला आपुल्या
उत्स्फूर्त, कृतज्ञ, स्निग्ध भावनांनीं
गौरवितील !
म्हणतील आणि कृतार्थतेनें,
यथार्थतेनें,
" वन्दे मातरम् ।
सुजलां, सुफलां, सस्यश्यामलाम् ।
वन्दे मातरम् । "

# कृतज्ञ.

कृतज्ञ मी राहीन तुझा की सदैव रे जीवना !

घालुनि तूं निज मायापांखर
मम घडिलें व्यक्तित्व मनोहर
समृद्धीच्या–सुजाणतेच्या ओतुनिया भावना.

तव निःश्वासीं तेज उमललें
कलात्मतेचें क्षितिज विकसलें
तूंच उरीं उजळिल्या प्रीतिच्या अनुपम संवेदना !

पराक्रमाची दीप्ति फुलवुनी
कीर्ति दिली मज तूंच जिङ्कुनी
मजला नकळत पुसुन टाकिलें अहंपणाच्या व्रणा.

मोहाचें भिरभिरतां वारें,
स्वार्थानें पसरितां पिसारें
वळलेलें मम पाउल अडलें ऐकून तव गायना !

अमङ्गलांतिल मङ्गल आणिक
लौकिकांतलें लुप्त अलौकिक
दावितांच तूं चिर-सत्याची प्रचीत ये मन्मना.

श्रद्धेचा मम तूं तर आगम
मरणींहि मज तूं सञ्जीवन-सम
कृतार्थतेची मिरास माझी—तुझ्या कृपेच्या खुणा !
कृतज्ञ मी राहीन तुझा की सदैव रे जीवना !

## स्नेह मी जागवीन आपुला !

माहित होतें, जाल उडुनिया दोन दिसांनंतर,
—नव्हतें ठाउक असें वियोगीं उलेल हें अंतर !
पळापळानें झेपावत परि सन्निध ये वेळ ती,
दोन दिसांतिल उत्सव-चित्रें भिरभिरतीं भोंवतीं—
ती सूर्योपासना, वन्दनें, तीं तेजोगायनें !
आकाशहि उन्मुक्त विहरतां आपण केलें उणें.
सामोरे चाललों दिशांना घेत उंच मंडलें,
नव्याच त्या अनुभूति—हर्ष नव हृदयीं ओसंडले !
अजून तर त्या उन्मादाचा नच ओसरला भर
तोंच पातली वियोग-वेळा, उलतें हें अन्तर !

माहित होतें, जाल उडुनिया दोन दिसांनंतर
—नव्हतें ठाउक परी वियोगीं उलेल हें अन्तर !
—ज्ञात तुह्मांला किति मजला प्रिय तुमची मधुसंगति—
कर्तव्याचे परि हे प्रियतर पाश इथें बांधती.
उद्यां उतरतिल नवीं पांखरें चहुंकडुनी या स्थलीं,
पुन्हां सुरू होतील गायनें, वंदन, मंत्रावलि !
आणि पुन्हां स्वच्छन्द विहरतां घेत उंच मंडलें
चमचमतिल त्या अपूर्वतेनें त्यांचे डोळे निळे !
त्यांच्या इवल्या नयनांतिल ती बघून तेजःकला—
—जा, जा, प्रिय विहगहो ! — स्नेह मी जागवीन आपुला !

## या दिनान्तीं–

मी कितीदां झेलली हो, आपदेची लाट माथां
भग्न आकांक्षा जहाल्या–वाटली ना खंत त्याची !
घातला ओठीं सुखाचा घांस ना पोटीं रिघाला
लाधलें हातीं कितीदां श्रेयही साण्डून गेलें–
झुंजलों अन् मूकतेनें सोशिले आघात सारे
संयमें त्या मात्र आतां ऊर संज्ञा-शून्य झालें
कां परन्तू या दिनान्तीं शुष्क वृक्षांच्या तळाशीं
खिन्न पाचोळा पहातां हें उभे डोळयांत पाणी ?

## भर रस्त्यावर–

भर रस्त्यावर
घाईंत–गर्दींत
चालतांना कधीं
वाटतो आलासे
कानीं तुझा शब्द !
नकळत आणि
पाय थाम्बतात
डोळे वळतात
इकडे–तिकडे
भिरिभिरि वेडे
घेत तुझा शोध !

–आणिक मनाचा
साधून एकान्त
जनसम्मर्दांत
सावकाशपणें
वाचूं लागे जीव
उलटलीं पानें
मागलीं एकेक !

क्रमांक
नों. दि.

# माझिया भोंवतीं–

माझिया भोंवतीं
मायेच्या वेलींचे
नाजुक, पोपटी, रेशमी बंध !

–माझ्याच आधारें रोज या वेली
वरती–वरती चढत होत्या
वाढत होत्या
डंवरत होत्या कळयांनीं, फुलांनीं
–केवढें सुखद संवेदन तें !–
फुलांचा सुगंध वर्षत होता–
माझिया मनींच्या सांवळ्या रात्रींत गोरटें चांदणें !
अपूर्व गोडी ती–
मधुर तंद्री !
–गोड त्या गुंगींत
चंदेरी धुंदींत
कळलेंच नाहीं:
नित्य जखडत आहेत मज हे रेशमी बंध !

—आणिक आज
बधें तयांतून व्हाया मुक्त, परी—
तयांची गुम्फण
चतुर, सुन्दर—नाहीं सोडवत,
नाजुक हे बन्ध
नाजुक असून नाहीं तोडवत !
—कोमेजून गेलें गोरटें चांदणें
मधुर तंद्री ती भंगून गेली—
उरले भोंवतीं
आज हे केवळ
सुदृढ, हिरवे, रेशमी बंध !

## डोळे तुझे बदामी–

सम्पून यौवनींचीं
गेलीत भावगीतें
हीं तत्त्वशील आतां
प्रिय वाटतीं सुनीतें.

–त्या भाव-जीवनाचे
उडुनी सुवास गेले
स्वर-सङ्गती निमाली
रस-रङ्ग नष्ट झाले !

निःश्वास प्रीतिचे ते....
स्मरतां हंसून आतां
म्हणतों तटस्थतेनें :
" तो पोर-खेळ होता ! "

–तरिही उदास होतां
सायन्तनीं कधीं मी–
स्मरती अजून भोळे
डोळे तुझे बदामी !

## सल.

रोजचीच चाकोरीची  चालतांना पायवाट
अवचित वळणाशीं  झाली तुझी-माझी भेट
कधींपासूनीच तुझा  होता लागलेला वेध
आणि तुझीहि नव्हती  काय जाहली पारध ?
—ऐनवेळीं मात्र गेलों  बावरून-गोंधळून
सम्भ्रमानें वा आपुले  श्वास ठेविले रोधून !

बोलायाचें असूनीहि  गूज दडविलें ओठीं
मनामधिं असूनीहि  हात गुम्फिला न हातीं—
—तोंच गेलीस पुढून  गेला ! सम्पला तो क्षण !
सञ्जीवक मणि गेला  माळेतून ओघळून !

झाला असता तो क्षण  शेष जीवनीं शाश्वत—
म्हाला असता काळोख  पुनवेच्या चान्दण्यांत !
—कधीं गहिंवर येई  जीव होई चोळामोळा
आणि आंत खुपे सल :  ' ये न सन्धि दोन वेळां ! '

# अधुरें गीत.

अधुरेंच राहिल गीत तें !

नच चार पंक्तिहि गुम्फिल्या— मम भाव अस्फुट राहिला
तरि माझिया हृदयांतले मृदु बोल जाणवले तुला !
नित हेरितेस अचूक तूं माझ्या उरींचीं वांछितें—
अधुरेंच राहिल गीत तें !

म्हणतेस तूं मजला अतां कीं, गीत तें पुरतें लिहा
अन् मीहि गे, तुज सांगतों कीं, ती मनीं आहे स्पृहा
परि शब्दही लिहिण्या पुढें मन हें आतां नच इच्छितें
अधुरेंच राहिल गीत तें !

इतुकें न कां कळतें तुला— निःशब्द ती मम भावना !
कळते अनुक्तपणेंच कीं हृदयांतली संवेदना
शब्दांत दुर्बल केविं या गुम्फूं उरींचीं कूजितें ?
अधुरेंच राहिल गीत तें !

अधुऱ्याच त्या गीतावरी गे जीव माझा गुंगतो
अधुऱ्याच त्या गीतांतुनी मम भाव उत्कट वाहतो !
गमतें न कां तुजला गडे, अधुरेंपणांतच पूर्ण तें ?
अधुरेंच राहिल गीत तें,
अधुरेंच राहिल गीत तें !

## प्रीतीच्या पांखरा !

प्रीतीच्या पांखरा !
घातली कासया मजला साद !
—आलास कुठून अवचित पुढें
बैसलास माझ्या निकटीं स्नेहानें—
जणुं तुझी—माझी
जनान्तरींची होती जवळीक !
जणुं तुझा—माझा
युगानुयुगींचा होता अनुबन्ध !
—आणि उघडून माणकांची चोंच—
गायिलेंस तूं—
अमृतापरी अमर गीत तें आपुल्या प्रीतीचें—
जयांत होते साकार जाहले
अनन्त तरंग माझिया उरींचे
रम्य परिमळ हृदय—पुष्पाचे,
सौन्दर्य अवघें जीवन—वृक्षाचें !
आणखी पाहात राहिलास मग—
माझियाकडे,
आतुर दृष्टि—
स्नेहाळ, उत्सुक, बोलकें मौन !

प्रीतीच्या पांखरा !
जाणलें कसें तूं माझिया हृदींचे अमूर्त भाव !
--अज्ञात वाणीचे अनुक्त बोल ?
--जाणवलें कसें संवेदन हें ?

--कधींच नव्हती घातली तुज मी
खुणेची शीळ....
--कधींच नव्हता पालवला हात
हांकराया तुला....
कधींच नव्हता घेतला वेध
माझिया दृष्टीनें तुझ्या हृदयाचा-
--जरी माझा जीव
तुझ्याच प्रीतिच्या स्वप्नांत होता
तरङ्गत नित्य !

प्रीतीच्या पांखरा !
कासया मग तूं घातली सांग रे,
मजला साद ?

प्रीतीच्या पांखरा ! माहित होतीं-
माझिया जीवाचीं बन्धनें मज
दुर्भेद्य पंजर माझिया भोंवतीं-
सङ्कोचित सारें येथलें जीवन-
कोण्डमारा येथें फुलत्या फुलांचा
--केविं मग तुज हांकारूं येथ ?
--काय अडवून तुजला येथें
घालावा तुझिया स्वैर सञ्चाराला पायबन्द मीं?
म्हणून सदैव केलें मदीय मीं
पिंजऱ्यापरी त्या हृदय बन्द !

प्रीतीच्या पांखरा !
अनन्त आकाश तुझिया स्वागता !
विशाळ जीवन साद घालितसे तुजला कधींचें!
घे तर येथून बेफाम भरारी
घाल गवसणी विराट गगना—
—येथूनच मी
बघेन तुझें विजयी जीवन
सोत्कण्ठ, सानन्द !
त्यांतच आतां सांठवले माझे
आनन्द, हर्ष,
सुख, समाधान !

## उशीर–

आलीस उशीरा ! –सखि, अपुल्या प्रीतीची–
उशिरानें पटली साक्ष तुझ्या हृदयास !
स्वागता अतां परि पसरुं कसे हे बाहू ?
–बन्दिस्त मधें मी ! आणि बन्द ही वेस !

मी बोल कशाला लावुं तुला, दैवास ?
शापून व्हायचें काय सखे, नियतीला ?
–हें अमृत, विष वा : मज ही प्रिय न चिकित्सा
ओठांस लावितों मी हा अपुला पेला.

‘ होईल आपुलें मीलन पुढल्या जन्मीं ’–
धरणार न उरिं मी असली दुबळी आशा
काव्यात्म, भाव-वश होउनि सायंतानिं या
टक लावुनि गगनीं नच सोडीन उसासा !

उशिरानें इतुक्या हा स्वर-सङ्गम झाला
अन् क्षणभर गेलें जीवन झङ्कारून
सम्पलें सुनेंपण क्षण अवघ्या जन्माचें–
याचाहि उणा नच होइल मज अभिमान !

# नवें प्रलोभन.

नकोच आतां नवें प्रलोभन !
असेंच राहो नित तिमिराङ्कित, जीर्ण-शीर्ण हें माझें जीवन !

एकवार या हृदयावरती
इन्द्रधनुपरी स्वप्नें फुललीं
क्षणभर सहसा सङ्गमोत्सवीं
शत-दीपांची रांग उजळली
पुण्यक्षणिं त्या सहज निघालें, किल्मिष युगयुगिंचें प्रक्षाळुन !

क्षणांत परि तीं स्वप्नें विरलीं
क्षणांत ते शत-दीप निमाले—
आकाङ्क्षांच्या विद्ध उरांतुन
क्रन्दन आर्त उदास उसळलें
भग्न जिवाला तीच मिळाली, साथ भयानक अन्धारांतुन !

—आणि आज या मरुभूवरती
आलिस तूं सजवाया नन्दन
भग्न मंदिरीं, भग्न मूर्तिचें
करावयाला बघसी पूजन !
भाव-गर्भ नयनांतुन करिसी, मृत शकलांवर अमृत-सिञ्चन !

—क्षणांत लावुनि पिसें जिवाला
क्षणांत जाशिल निघुनी येथुन—
शतधा वाढुनि तम भंवतीं, मम—
उरलें-सुरलें ग्रासिल जीवन...
नकोच तें तव येणें-जाणें...आवर अपुलें भावनिबन्धन !
नकोच आतां नवें प्रलोभन !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# ओळख.

माझीच दिली तूं ओळख मजला करुनी !

निज निर्ममतेचा पूर्ण जया अभिमान
–मज माहित–असला केवळ मी पाषाण,
परि तूंच दाविली आंतिल अनुपम लेणीं !

मज गमलें: झालें मूक मनाचें द्वार
अन् आर्त सुनेंपण नित्य इथें वसणार
तों निगूढ आंतिल ऐकविलीं तूं गाणीं.

येथें न कधींही झुलायचे फुल-घोंस
हा भाव मनीं, परि घडतां तव सहवास
क्षणिं जागृत झाल्या बकुलांच्या आठवणी.

मम हृदय न, ही तर मरुभूमी धगधगली !
परि नवल कथियलें तूं, "या ज्वालाखालीं–
खळखळतो निर्झर –जिवन्त आंतिल पाणी !

मी समजत होतों : नीरस अन्तर माझें
सुकुमार भावना आंत यावया लाजे–
तूं खुणा प्रीतिच्या त्यांत दिल्या उमटवुनी !
माझीच दिली तूं ओळख मजला करुनी !

## अडसर.

निघतां जाया–लगबगिनें तूं उठुनि, घातलास
गौर, सकङ्कण तव बाहूचा अडसर दारास
सङ्कोचुन थबकलों न कळतां, गोड सम्भ्रमांत
" याल पुन्हां कधिं ? "–दरवळला तो सुवास शब्दांत
अखेर येतां निरोप घेऊन, निवान्त मार्गांत–
तें कङ्कण, ते शब्द निघाले करित मला साथ
–शिरीं फुलें माळुन तारांचीं लाजुनिया रात
धुन्द सुगन्धीं गुम्फित होती गर्द निळें गीत,
मोगरिचे मृदु अडसर होते क्षितिजा अडवीत,
चालत मी—परि थबकत होती पुन्हां पुन्हां वाट !

# मूक प्रीत ही–

तुझ्या स्मृतीनें सखये, येतो भारावून ऊर
झाला नियतीचा जय तूं-मी आज दूर दूर.
मात्र तुझ्या-माझ्या मनीं स्निग्ध प्रीत ओथम्बली
साक्ष याची तुला-मला असे पुरती पटली.
जरी मनाच्या पाकळया झाल्या नित्याच्याच बन्द
दडलेलें राहिलें गे आंत रूप, रस, गन्ध !
मूक प्रीत ही आपुली ज्ञात सखे, तुला-मला
नाहीं लागूं दिली तिची दाद आपण जगाला !

कळतांच दुनियेला हंसें करून आपुलें
लाख जिव्हांनीं जगानें उणें असतें काढलें
अवमान, उपहास शिव्याशापांचे आघात
हीच किम्मत प्रीतीची दुनियेच्या बाजारांत–
विडम्बन असलें हें झालें नसतें सहन
याचसाठीं आजवर राणी घातलें बन्धन !

आतां मात्र कधीं-मधीं मनीं तरळतो भाव :
ठेवावी कां दडवून नव लाखाची ही ठेव ?
गूज आपुलें साङ्गावें जगताला आक्रन्दून
आणि निधडें करावें ऊर, सोसायला घण !

## नांव.

दोघेंच त्या तिथें होतों गे आपण
'घे नांव '–सहज मीं तुज म्हटलें हांसुन
त्या एकान्तांतहि लाजलीस तूं किती !
ये नांव उफाळुन ओठीं –फुलली द्युति.
जिव्हाग्रीं कितिदां क्षणांत तें नाचलें
बाहेर पडाया परन्तु सङ्कोचलें,
राहिलें म्हणुनि तें अधरा ओठङ्गुनी
घेतलें टिपुनि मम ओठांनीं तत्क्षणीं

## व्यथा मनांतिल–

आलों होतों साङ्गाया तुज
व्यथा मनांतिल सलें उरींचीं
पाश माझिया अभिमानाचे
पुन्हां पुन्हां जरि अडवित होते–

बोलत होतिस उल्लासुन तूं
विविध परींच्या विषयावरती
शब्द विचुक मी पेरित होतों
'ठीकच', 'हं हं !' असलें कांहीं !

तूं कसलासा विनोद करुनी
प्रसन्नता उधळतां रुपेरी
कसेंबसें ओढिलें मुखावर
क्षणभर मीं वरपाङ्गी हांसूं !–

–अशीच गेली घटका सम्पुन
मलूल होउन उन्हें परतलीं
व्यथा मनांतिल, सलें उरींचीं
तशींच ओठांआड राहिलीं–

आणिक जेव्हां निरोप घेउन
निरुपायानें उठलों तिथुनी
निःश्वसलें हलु अभिमानी मन
" जिङ्किलेस तूं ! जिङ्किलेस तूं ! "

## मुका मार.

उगीचच रागावून
दिलास कां मुका मार ?
शब्दाहून कडू झाली
तुझ्या अबोल्याची धार !

—माझें दुःख, तळमळ
तुला सांगायाची चोरी
सत्य कळतांच, तुझ्या
वार होईल जिव्हारीं !

## रहस्य.

अर्ध्यावर अपुली प्रीति-कथा थाम्बली
तरि मग्न आज मी या माझ्या जीवनीं–
ठाऊक जयांना रहस्य हें आपुलें
ते विस्मित होती बघून माझ्याकडे
वाटतें तयांना : नित्य उसासून मीं
मनिं झुरत रहावें विरही यक्षापरी,
उल्लेख करावे त्या पूर्वप्रीतीचे–
आणखी म्हणावें : ' हें कसलें जीवन ! '
मग सहानुभूती थोर दावुनी मला
शिकवावी त्यांनीं जनरीती साजिरी
–परि मला न याची मुळींच सखये रुचि,
प्रीतीचें नाटक नको असें व्हायला !

–माझिया हृदयिंच्या गाम्भ्यामधिं खोल ती
राहिली आपुली प्रीत अमर होउन
कधिं उत्तर-रात्रीं जागृति येतां मला
करितसे तिचें मी मूकपणें पूजन,
कधिं खिन्न सांज मज वेढुनिया टाकितां
ती सहज विजेपरि उजळुन जाई मन !
–मग वृथाच करुनी बोभाटा प्रीतिचा
मी तिचें विडम्बन सांग, कशाला करूं ?

## अजूनहि कधीं–

अजूनहि कधीं
ऐन झोंपेंतून
अवचित येते
मजला जाग
आठवते ती
सांवळी मुद्रा....
ओठांची ठेवण....
गालींचा व्रण....!
–उरलेली रात्र
बसते उशाशीं
जागत जळत
अस्वस्थ होऊन !
–आणि उजाडतां
हांसून तिजला
सकाळ म्हणे
" वेडी ग वेडी ! "

## चूक—

आणिक सहजीं हंसतां हंसतां
बोलुन गेलों मी कांहींतरी
चमकुनि त्यांतिल मर्म मनामधिं
झालिस निमिषीं गोरीमोरी

उमजुनि आली चूक मलाही,
ये ओठांतून कसें नको तें....!
—सुटला होता बाण परन्तू
कांहिंच हातीं उरलें नव्हतें !

विचित्र ती स्तब्धता पुसाया
उगीच कांहींतरी बोललों
वितण्ड केलें शुष्क उगीचच—
उसन्या उल्हासानें हंसलों !

येतांना परतून घरीं मीं
किती दूषणें दिलीं स्वतांला
—पदोपदीं परि बिलगत होतें
कांहीं अस्फुट मधुर जिवाला !

—कधिं कधिं अजुनी वादाच्या भरिं
अवचित फुलतो उरीं फुलोरा
—अवचित जातो तरळुन भारुन
भाव तुझा तो गोरामोरा

## त्या निवान्त रस्त्यावरती–

त्या निवांत रस्त्यावरती
कुणीच नव्हतें भंवतीं
वळणावरच्या विद्युद्दीपाखालीं
आपण दोघें–
शिरीं तुझ्या तो प्रकाश पिंवळा, धूसर
ओठांवरती अर्धीं-मुर्धीं वाक्यें–
हालचाल अस्वस्थ उगीच मधून–
दृष्टि कोरिते पायतळींचा रस्ता....
कांहिंतरी मी उगीच पुसतां तुजला
सहजच
भिडले डोळे चार
मात्र थरारलिं आवेगानें तव अधरांचीं पातीं
–आणिक सहसा
फिरवुन पाठ तिथून
झपझप गेलिस अंधारांत निघून !

स्तब्ध उभा मी विद्युद्दीपाखालीं
आठवीत तीं अर्धीं-मुर्धीं वाक्यें–
थरथरणारीं पातीं–
उतावळी गति अंधारीं शिरलेली !

# या ताराङ्कित–

या ताराङ्कित अन्धारांत
जें कथिलें हळुच तुझ्या कानीं
करुं नकोस तें निस्तेज गडे,
भर दिवसां उच्चारून जनीं !

गे, चन्द्रफुलापरि नाजुक तें
धग दिवसाची नच सह्य तया–
झळकेल न जों रविकर पहिला
तों बद्ध पाकळया होतिल या.

फुलविशील जर तूं त्यास बळें
मधु गन्ध न तो येइल हातां–
–अर्थशून्य होइल ‘ आतांचें ’
भर दिवसां उच्चारुन जातां !

## तुझ्या रुसण्याची रीत–

तुझ्या रुसण्याची रीत–
   जसें खिन्न, आर्त गीत
वेध घेई–आणि जाई
   नीट ऊर कातरीत

तुझें वागणें तटस्थ
   मुद्रा परकी वरितें
जणुं तुझें–माझें कधीं–
   कधीं नव्हतेंच नातें !

आणि डंख करी जेव्हां–
   शब्द तुझा उणा-दुणा
अहंकाराचें माझ्याहि
   मौन उभारितें फणा !

अबोल्यांत वाटे मग
   धागे रेशमी तुटले–
आतां केवळ मर्मांत
   वळ रुतून बसले–

–वळांवर हळुवार
   बोट फिरवितां स्मृति
आंत झंकार उठती
   अवचित : 'प्रीति ! प्रीति !'

तुझ्या रुसण्याची रीत
   अशी अबोल, बोलकी
भरी दाहक अमृत
   माझ्या पुलकीं-पुलकीं !

अनुक्रम २८४३०
विभाग ३१०५
क्रमांक ७३८३
नों. दि. २४।८।५४
वाचनालय

# या विश्वसागरावर–

ही क्षितिजाला तर मर्यादा भिडलेली
जळभार गज-घटांपरि नित करिती केलि,
या विश्वसागरावर मी एक तरङ्ग
अन् लहरि रुपेरी तूंहि किनाऱ्यावरली !

लघु जीवित अपुलें ! ये, क्षणभर निकटीं ये !
क्षण कराङ्गुलींनीं गुम्फूं सुन्दर वलयें
अर्ध क्षण घेऊं बोलुनि गूज मनींचें
क्षणभर मग जुळतिल निर्मळ अपुलीं हृदयें !

अन् क्षणांत दुसऱ्या विलग सखे, व्हायाचें
क्षणभरांत अवघ्या विरुन गडे, जायाचें
सम्पेल असा क्षणिं संसाराचा खेळ–
उत्पत्ति, स्थिति मग, पुढती क्षण विलयाचे !

–निज अस्तित्वाची खूणहि मग न उरेल
नव तरङ्ग-लहरी येथें उचमळतील,
त्या रचित राहतिल कराङ्गुलींनीं वलयें–
मीलनस्मृती निज शाश्वत जणुं करितील !

## तुझ्या हास्यांतून

कितीदां तुजला म्हटलें होतें
" तुझ्या हास्यांतून
ऐन भरांतील आम्रमोहराचा
उन्मत्त सुगन्ध दरवळतो–
बिलगून तुझ्या साऱ्या विभ्रमांना
निर्मित जाई तो तुझिया भोंवतीं
वेधक, दाहक किमया कांहीं ! "

–आज सहजच पाहिलें तुज मीं
आपुल्या बाळाला खेळवितांना
मुक्त हंसतांना–
आणिक वाटलें
" तुझ्या हास्यांतून टपटपते
पाडाला आलेल्या
आम्रफळांतली
शीतल, प्रसन्न, केशरी गोडी ! "

## भूल–

सरसर घागर सोडून
स्तब्ध उभी कां गे, अजुन ?
हात रहाटावर दोन्ही–
काय निहाळिसि वर गगनीं ?

–केशबन्धनीं चतुराई
दाविसि किति आतां बाई !
कुङ्कुम-रेखन हो न क्षणीं
कलात्मता भरते नयनीं–
फुलें गुम्फितां केसांत
उगीच थरथरतो हात
प्रिय अधिकच दर्पण आतां
डोकाविसि येतां-जातां !

गुणगुणतां कसलें गीत
काम करी नकळत हात
निवान्त होतां दुपार ही
काव्य–कथा वाचिसि कांहीं
त्यांत देखणा नायक तो–
हळुच तुझ्याशीं कुजबुजतो !
घोळविसी तें पुनः पुन्हां
दिस वाटे तरि सुना–सुना !

साञ्ज उतरतां आकाशीं
कां गहिंवर येई तुजशीं ?
काळवण्डलीं स्तब्ध जळें
तुज लाविति हुरहूर खुळे !
बघतां बघतां म्लान फुलें
तव डोळां पाणी जमलें !
तों श्रवणीं ये स्वर-लहरी–
क्षणांत बावरलीस पुरी !

–खिडकींतुन चान्द्रणें पडे
तुझिया शय्येवरी गडे
उल्लासा अङ्कुर फुटती
तव हृदयीं निमिषांत किती !
गज खिडकीचे मोजीत
स्वप्नांना ललकारीत
रात्रीची जागसि वेडे,
भूल कशाची तुला पडे ?

# आसूड.

तुझ्या शब्दांचा आसूड
कडाडतां अकारण
माझ्या हृदयावरती
वळ आले टरारून.

क्षणीं निष्पाप उरींचा
कढ उफाळला वर
ओठीं दाबून हुंदका
तया घातला आवर !

प्रौढ अश्वत्थापरी मी
स्तब्ध ठाकलों समोर–
तोंच कडाडला पुन्हां
तुझा आसूड आतुर !

--आणि आतां अपराधी
तुझी कातर नजर
त्याच सलत्या जागेला
स्पर्श करी हळुवार.

–माझ्या संयमाचे सात
तट क्षणांत ढळले
आणि रुद्ध आंसवांचे
डोळां पाझर धावले !

## निघतांना–

शीट फुङ्कली गाडीनें
आणि दचकलों उरीं
–निघतांना माऊलीच्या
वाकलों न पायांवरी

–पापा घेऊन बाळाचा
गाल नाहीं कुस्करला
–तिच्या अधिऱ्या डोळयांशीं
नाहीं भिडविला डोळा !

साऱ्या प्रवासांत आतां
हुरहुरे क्षण क्षण
वारंवार चुकचुके
माझें बुद्धिवादी मन !

# संहारचक्र.

ही वैशाखांतिल तप्त निवान्त दुपार–
निःस्तब्ध विसांवत पहुडे स्थिरचर सारें
गलियन्त्रीं ग्रासुन मूर्च्छित करित तया तों
रोंरावत उठलें वादळ राईकडुनी

–पिळवटलीं अङ्गें-विव्हल झाले वृक्ष
कडकडा मोडल्या फान्द्या-ढळले बुन्धे
क्षणिं तुटले जीवन-बन्ध –दैन पानांची...
–संहार-चक्र तों गेलें तेथुन दूर.

–मी उभी सुरक्षित अपुल्या माडींतून
पाहतें घेउनी छकुल्याला हृदयाशीं
धरणीवर पडला सडा बाळ–कैऱ्यांचा !–
–गजबजून अन् हो सुन्न, रिकामें ऊर !

## सिद्ध व्हायचें हांसून–

जीवनाची वाट कांहीं चालूनीया आलों दूर
नव्या-नवतीची गेली मावळून हुरहूर !
आशा हिरव्या तेव्हांच्या गेल्या कधींच सुकून
मूक कोकिल जाहले, तरु चालले वठून
हाय ! भरल्या नदीचें ऊर गेलें दुभङ्गून
रस आटले–वाराहि टाकी श्वास ऊन-ऊन !
–गेला ! वसन्त सम्पला ! आग ओतीत पुढून–
ग्रीष्म आला– स्वागताला सिद्ध व्हायचें हांसून.

## हीं सौन्दर्यें—

सायन्तानिं केव्हां निवान्त त्या नदिकांठीं
ओठांवर रुळतां अवघ्या मधु गुजगोष्टी
पाण्यांत सोडुनी पाय करावी क्रीडा
दृष्टीस बोलकी अन् भिडवावी दृष्टि !

चहुंकडे असावी गर्द जांभळी छाया
सुकुमार गारवा—त्याचीं शीतल माया
अन् परस्परांच्या कुशींत उत्तर-रात्रीं
पहुडून रचावी नवलाईची दुनिया !

गावीत रुपेरी गीतें चंद्रासङ्गें
अणुअणू फुलावा त्या उन्मत्त तरङ्गें
बेहोषुनि घेतां तुज सहसा हृदयाशीं
ओथम्बुनि यावीं मदिरेनें अङ्गाङ्गें !

हिंडतां पहांटे गुंफुन हातीं हात
उजळत्या तमांतुन शोधित पाउलवाट
    विश्वावर चढुनी प्रसन्नतेचें पाणी
हर्षांची हृदयीं उसळुन यावी लाट !

हीं सौंदर्यें, हें काव्य मधुर यांतील,
प्रिय मजला होतें, आहे, प्रिय राहील !
    परि आज 'सख्या हें जीवन अधुरें, अपुरें'
जाणीव जाळिते जिवा अशी आंतील !

वाटतें अतां कधिं : दुपार जळत असावी
उरिं संघर्षांची आतुर हांक घुमावी
    क्षणिं अपुलीं अवघीं सामर्थ्यें जुळवून
झुञ्जारपणांतिल रुद्र चारुता प्यावी !

## नियति !

प्राशून विषाचा प्याला आम्ही जगूं
दाविसी सुधेचीं प्रलोभनें कासया ?
तव कराल शस्त्रें कांपति आम्हापुढें
कां नाजुक अस्त्रें म्हणून हीं आणिसी ?
तव लाघवांतलें कपट अम्हीं जाणलें
आम्ही न सावजें तुझीं, पाश आवर;
मृत्यूस मारितों ठोकर आम्ही अशी–
कधिं तरी म्हणूं कां, "नियति, करी गे दया!"

## जीवन ! जीवन !

रसरसलेली दुपार माथां,
दिवस धावतो धापा टाकित !
हे बाजुस रस्त्यांत खडीच्या
लोळत गेले रूळ दूरवर
अन् रणरणत्या उन्हामधें या
मजूर येथें कष्ट उपसती.
घणघण, खणखण अधिकच वाढे
स्तब्धतेंत या जळत्या-कढत्या !
—कर्कश फुङ्कुन शीळ, धडाडत
क्षणामधें तों गाडी गेली—
क्षण निढळाचा घाम निपटुनी
पुन्हां सुरू हो क्षणांत खणखण !
आघाताच्या ठिणग्यांतुन तों
घणघणले ध्वनि, ‘ जीवन ! जीवन ! ’

क्षितिजावरती चन्द्र थबकला—
आडबाजुच्या वळणावरती
हात तिच्या हातांत गुम्फुनी
हृदय तयानें उघडें केलें—
क्षणभर वरच्या निम्बतरूचा
प्रेमळ दरवळ तरळुन गेला—
आणि तिच्या ओठांवर त्यानें
हळूच अपुले ओठ टेकले
—मिटले लोचन उघडुनि बघतां
परस्परांच्या नजरेमधिं ते
वाचुन गेले : ' जीवन ! जीवन ! '

नुकतें हें घरकाम सम्पलें
गजबज घडिभर शान्त जहाली
—वैशाखांतिल हे सरते दिन
उष्ण झळा...अन् तगमग...तळमळ
माजघरांतिल थण्ड भुईवर
घेउन उजवा हात उशाला
जरा टेंकली माय-माउली.
—बाळ पुढ्यामधिं झोपीं गेलें—
नीज भरुनि ये तिच्याहि नयनीं,
शान्त, सन्थ त्या निःश्वसनामधिं
कुजबुज झाली : ' जीवन ! जीवन ! '

वरुन वर्षती पाउस-धारा
आषाढांतिल ही पहिली झड
पायतळीं चिखलाची रपरप—
शेतकरी करितसे लावणी
—उरिं चिन्तेचा ढग नित वर्षत

झडीवरी झड–सरीवरी सर,
मात्र मधूनच चमकुन जाई
सोनसळी कधिं वीज सुगीची
त्या आशेवर लावुन डोळे
अन्नदेव हा रोज राबतो !
इरल्यांतुन ओघळतें पाणी–
–त्यांस न कळलें, परि–पुटपुटलें
आर्द्र अधरिं : ' हें जीवन ! जीवन ! '

अन् संस्कृतिचा भाष्यकार तो !
प्रज्ञा चिन्तन-लीन तयाची
सहानुभूति अथाङ्ग हृदयीं
प्रतिभेची नव दीप्ति मुखावर
मग्न जाहला वज्र-लेखनीं–
रक्त-कणांतुन शब्द उमटती
क्षितिजें उज्वल नवीं जन्मती
जिवन्तपण सळसळतें त्यांतुन.
स्थिरतां क्षणभर दृष्टि तयावर
अद्भुत शाईतिल तें अक्षर–
गर्जुन उठलें : ' जीवन ! जीवन ! '

## माझें बकुळीचें जग !

अत्तराचे दीप येथें
    करितात झगमग
सुवासाच्या आवारांत
    माझें बकुळीचे जग !
साही ऋतु, बारा मास
    येथें नवतीची कळा
सुख विलासांत येथें
    कांहीं आगळा जिव्हाळा.
येथें आर्त जीवनाची
    हांक नाहीं पोहोंचत
नाहीं क्षुब्ध अशान्तीची
    धग जाळत-पोळत !
एक माझें मन मात्र
    नित्य येथें उसासतें
सुवासाच्या आवारांत
    सुख तयाला खुपतें !
जेथें जिण्यासाठीं चाले
    सुखदु:खामध्यें द्यूत
फांसे टाकायाला तेथें
    आतुरले माझे हात.
—पाश तुटावे येथले
    उरीं जागे तगमग...
ओठीं मात्र शब्द उभे
    ' माझें बकुळीचें जग ! '

## मत्स्यावतार.

इवल्या इवल्या रुपेरी मेघांचा
पसरला आहे लाम्बच लाम्ब
ओघ आकाशांत
निमुळता होत दोन्ही क्षितिजाशीं.
विराट मत्स्याच्या खवल्यापरी
दाटीवाटीनें रचिले मेघ
एका पाठोपाठ.
किञ्चित कलतें पुच्छ टेकलें
पूर्व क्षितिजाशीं !
मेघांच्या दाटींत
मधूनच कुठें
झळकून दिसे चमक ताऱ्यांची–
पश्चिम क्षितिजीं
थबकलेला हा पूर्ण चन्द्रमा
डोळाच जणूं या मत्स्याकृतीचा !

प्रसन्न, निरभ्र, निर्मळ आकाश
आजूबाजूला–
–विश्व-सङ्कटाच्या पहिल्या दिनीं त्या
प्रभूनें घेतला
हाच कां पहिला अवतार तो ?
–मत्स्यावतार ?

# भूपाळी—

पानांच्या जाळींत सांचला काळोख
—नाहीं उजळलें आकाशाचें मुख !
दूरचें क्षितिज, डोङ्गर निद्रेंत
प्रसन्न गारवा जवळ जागत

—निःस्तब्धपणीं हा दारीं उभा निम्ब
कललें खालती फिकें चन्द्रबिम्ब,
तयाचें नाजुक पिवळें लावण्य
खळाळत्या जळीं दिसे लकाकून

—भङ्गल्या घाटाच्या चिऱ्यांत, फटींत
पाऊल वाटांच्या बावऱ्या दाटींत
फुलत्या कळ्यांच्या अस्फुट वासांत
घुमतो नदीचा मन्त्रघोष सन्थ !

वाटतें : मोकळा करूनिया कण्ठ
म्हणावी भूपाळी उच्च आवाजांत !

# दुपार.

ही इतुक्यांतच नेत्र चुम्बुनी नीज पळाली दूर
सुस्त मनाला स्मरतो कुठला तरि चुकलेला सूर
अङ्ग अङ्ग हे शिथिल न सहवे हा ग्रीष्माचा मार
तप्त धुळींमधिं पडे पेङ्गळुनि, रस्ता काळाशार
स्तब्ध उभा त्याचिया कडेला पिम्पळराज विशाल
मलूल होउनि असहायपणीं, लटके पालव लाल
पिवळ्या खुरट्या गवताचा त्या तिथुन पसरला माळ
दूर तांबडें छप्पर झळके, उन्हामध्यें तेजाळ
सकाळची मृदु निळी-जाम्भळी, माया विरुन, समोर
हटयोग्यापरि अग्निसाधनीं डोङ्गर मग्न कठोर
नजर न ठरते गगनिं मात्र कधिं, तरळुनि जाई घार
ढोर कुठें एकलें विसांवत, बघुनि सावली गार
दुपार ही उजळल्या यौवन-स्वप्निं आपुल्या चूर
सुस्त मनीं रेङ्गाळे तिचिया कुठला चुकला सूर ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्र. क्र. 1382


## ओसरलें वादळ.

झुञ्ज आतां सम्पली
  ओसरलें वादळ
सान्द्र भावनांपरी
  मूक जाहलें जळ !

मेघखण्ड नभांत
  कुठें कुठें पाङ्गले–
भग्न अवशेष वा
  साक्ष द्याया थाम्बले ?

दूर ' वेळे ' वरती
  वळ अजून ओले
वादळल्या लाटांचे
  सांकळून राहिले.

८.१

कुठें पाखरांचीहि
   चाहूल न जाणवें
किनाऱ्याशीं टेकलीं
   स्तब्ध, शीर्ण तारवें.

अवकाशाचें शून्य
   गमे विशालतर–
शुष्क सरितेपरी
   रिक्त जाहलें ऊर !

मावळला आवेश–
   त्वेष, ईर्षा आटली
नसानसांत आतां
   शिथिलता सांठली.

दुःखभारासारखा
   जड जाहला श्वास !
चहूंकडे दाटला
   सुनेपणा उदास !

–कधींच कां वादळ
   व्हायचें न फिरून ?
स्तब्धपणींच कां या
   विरायचें जीवन ?

# पावसाळी हवा.

औदासीन्य जिवास व्यापुन उरे—ही पावसाळी हवा !
 राहीं भोंवतिं खिन्न, सर्द असली निःस्तब्धता दाटुनी
 कोठें तें हलतें न पानहि, करी कीं कोण्डमारा कुणी
आकाशामधिं काळखण्डुनि उभा भ्याल्या ढगांचा थवा.

केव्हां गर्जत वीज येईल ? कुठें तें ताण्डवी कौतुक ?
 कोठें वृष्टि सवेग नित्य हिरवा आल्हाद जी शिम्पिते ?
 केव्हां सृष्टि दिसेल तृप्त नि कुठें तीं सार्थकाचीं स्मितें ?
या ध्यासामधिं रङ्गतां, न कळतां मी होय अन्तर्मुख !

तों ही पालटते कळाच—पडतें कांहीं नवें दृष्टिला :
 पूर्वींचे स्मृति-सुप्त मन्त्र फिरुनी मेघांपरी गर्जती
 मूक स्वप्न-मयूर कण्ठ फुटुनी बेहोशुनी नाचती,
 ये सोसाटुनि कोठुनी न कळतें आवेश वाऱ्यावरी
 आकाङ्क्षा मग साण्डतात हृदयीं वर्षाव झाल्यापरी
अन् उल्लासुनि ऊर ये रुचिरता साऱ्या मनःसृष्टिला !

## कातरवेळेस–

या कातरवेळेस अनामिक
   दुःख हृदयिं कां यावें दाटुन?
विद्ध-पंख वेदना कोणती
   फडफडुनी ही जाय उरांतुन?

क्षितिजावरती लावुन डोळे
   केव्हांची मी उभी अहेतुक
उन्हें उतरतीं परतुन विटलें
   सन्ध्या-स्वप्नाचें मधु-कौतुक!

धूसरता गगनांत सांठली
   हळुच उतरली गिरिशिखरीं मग
घरङ्गळत व्यापिलें तियेनें
   माळ, शेत, नदि–हें अवघें जग!

उदासपण सांवळें हळुहळु
   पुढें सरकलें, त्यांतच आणिक–
अन्धाराचा अजगर केला
   गिळून हें धरणीचें माणिक

चाहुल रातकिड्यांची लागुन
   खिन्न शान्तता करकरली कीं!–
–विद्ध वेदना ती हृदयांतिल....?
   गडद तिचा हो रंग आणखी!

अनुक्रम ९८४३९
विभाग का.८४
क्रमांक ७३८३
नों. दि. २४।८।४
... वाचनालय ...

# कळ.

‘ कुहू–कुहू ’ ऐकतां तुझें, कळ हृदयीं चमकुनि उठते ग ऽ
क्षणभर गहिऱ्या नजरेचें जणुं उरांत शिरतें पातें ग ऽ

असह्य होतें सुख तें क्षणभर
कांटा फुलतो क्षण अंगावर
क्षणांत फिरुनी ऐकाया ‘ कुहु ’ आतुर उरिं धडधडतें ग ऽ

हातांतिल मग काम थबकतें
मन तर दचकुनि भिरभिर बघतें
उत्कण्ठेमाधिं अधुरें, अस्फुट नवेंच कांहीं स्फुरतें ग ऽ

आम्ब्यावर मग नजर खिळवितों
वेध तुझा घ्यावया बघें, तों–
पानोपानीं गुम्फित गाणीं स्वरलहरी थरथरते ग ऽ

–काय तुझ्या तर मनांत बाई ?
समजत नाहीं–उमजत नाहीं
हृदयाचें पांखरूं मात्र हें, पुन्हां-पुन्हां फडफडतें ग ऽ
‘ कुहू-कुहू ’ ऐकतां तुझें, कळ हृदयीं चमकुनि उठते ग ऽ

## साञ्ज.

साञ्जवेळ उलटली
बुडाला रविही जमुना-जळीं
रिघूं लागल्या हलुहलु कानीं रात्रींच्या चाहुली–

शान्त सर्व जाहलें
पुरांतुन सान्ज-दीप लागले
वृन्दावनिं अङ्गणीं उमललीं नव तेजाचीं फुलें.

रानांतुन परतल्या
गुरांचा घण्टा-रव थाम्बला
चरव्यांतुन धारोष्ण दुधाचा विरत फेंस चालला.

झान्ज तोंच वाजली
आरती मन्दिरांत जाहली
उञ्च सनइची लकेर सरती श्रवणिं घुमत राहिली.

बावरून काहुरीं
सारखी हुरहुरतें अन्तरीं
कळे न कसली हृदयीं इतुकी आर्त ओढ, शिरशिरी ?

–हळुच आसमन्त तें,
बोललें गुज कांहीं, वाटतें !
–अबोध कांहीं तरी जाणवुन अजुन ऊर दाटतें !

## वाट.

उभा नभाची मोजित उंची
कठोर काळा पहाड बाजूस–
आणिक इकडे दरी पसरली
शोध घेतसे रसातळाचा !

मधून माझी वाट निघाली
मुरडत वळणावळणावरती
मागुनि-पुढुनी परमेशापरि
आकाशाची स्निग्ध संगति !

कुठें घळींतिल हिरव्या, काळ्या
पाणथळीची चमके रेषा–
आपुलींच भक्षुनी पिलें कुणि
सुस्तावुन नागीण पसरली !

मधुनच येई खोल दरींतुन
घुमत गर्जना हिंस्र पशूंची
पाताळाची हांकच जणुं ती
उठवी अंगावरी शहारा !

कधीं कोसळे शिला अचानक–
कड्यावरून, घे ठाव दरीचा
सान्धित जाई उजवा–डावा
दुवाच उत्कण्ठित मरणाचा !

मी पुढतीं निःशङ्क चाललों
अननुभूत अनुभवीत, कांहीं–
निळसर, जांभुळ, गहन, गूढसें
हृदयिं निरंतर तरळत राही.

–मात्र कुठें तरि कडेकडेला
पिंवळीं, गवती फुलें उमलतां
थबकुनि नकळत बघत राहतों
फुलें, तुरे, गवताचीं पातीं !

## प्रक्षुब्ध गर्जतो—

१ : प्रक्षुब्ध गर्जतो विराट सागर पुढती
बेफाम जाहला हा तर वादळ वारा
करितील वाटतें क्षणीं जगत्संहार !
माहीत मला हें पूर्णतया असुनीही
दर्यावर देतों सोडुनि माझी नौका !

दे आंतुनि कुणि मज सञ्जीवक सन्देश
निज बाहुबलावर काय न तव विश्वास ?
—होऊन व्हायचें काय भयङ्कर अन्तीं ?
या सागरतळिंचा होशिल सुन्दर मोतीं
रे, झुञ्जत मरणें—रीतच झुञ्जारांची !

२ : प्रक्षुब्ध गर्जतो विराट सागर पुढती
बेफाम जाहला हा तर वादळ-वारा
करितील वाटतें क्षणीं जगत्संहार !
माहीत मला हें पूर्णतया असुनीही
दर्यावर देतों सोडुनि माझी नौका !

छे ! उगीच माझा नका करूं सन्मान
गौरवूं नका मम वृथा आत्मविश्वास
झुञ्जार न मी !—मी नच मृत्युञ्जय कोणी !
मरणास न समजा माझें हें आव्हान
असहाय मनाचें अगतिक हें बलिदान!

## गुपित.

जतन हें करुं कसेंऽ गुपित नाकळे मला !

संवादीं ऐन भरीं
ये अचूक ओठांवरि
भाषणांत खळ-न सुचे शद्ब सांवरायला !

सलतें मानें शल्य जिथें-
हळुच गुदगुल्या करि तें
मोरपीस गालावर फिरुन जीव हो खुळा.

घड केळीवर पाहुन
उर्मि सुखद उरिं दाटुन
तनुवरि रोमाञ्च उठे-उकलि भाव आंतला !

स्वप्नांतुन निशिं जागवि-
रचि दिवसां स्वप्नें नावें
किति लपवूं ! श्वासांतुन उजळति याच्याच कला !

व्यापुनिया नभ आंतिल,
आतां हें उच्छृङ्खल-
पङ्ख पसरुनी जनांत बघत झेंप घ्यायला.
जतन हें करुं कसेंऽ गुपित नाकळे मला !

## मोगरा.

अजुन मोगरा फुलला नाहीं !

—या नवयौवन निम्बतरूच्या पायतळाशीं
पखरण घाली
पिवळट, पांडुर, नाजुक मोहर—
उग्र, मधुर गन्धासव सेवुन
सळसळते वर तृप्त पालवी
—काय करूं परि
प्रिय हा माझा
अजुन मोगरा फुलला नाहीं !

—लवथवली ही वात्सल्यानें आम्र-माउली
कटिखांद्यावर घोंस फळांचे
इवल्या इवल्या;
आणि बाळसें किती तयांवर !
' धन्य ! आपुली कूस उजवली ! '—
कृतार्थतेची हृदयीं धुन्दी
मात्र दूरच्या क्षितिजावरती
वातचक्र बेभान फिरकतां
थरारते उरिं
आशङ्केनें—
—काय करूं परि
अजुन माझिया बहर कळ्यांना आला नाहीं—
अजुन मोगरा फुलला नाहीं !

—ज्वालांपरि वर ऊन रणरणे
तीव्र तयाची तिरीप लागून
विव्हळ पिम्पळ
माना टाकित राही त्याची
लाल किरमिजी, हिरवी नवती—
नकळत जातां नजर खालती
दिसे तियेला
शतधा उललें धरणीचें उर—
—काय करूं परि
अजुनहि माझा
मुग्ध मोगरा फुलला नाहीं !
अजुन गन्ध दरवळला नाहीं !

# पांखरा !

रोजच तूं येउनि बससी
हळूच या खिडकींत;
गढून मी गेलों असतों
अपुल्या उद्योगांत.

लागतांच अस्तित्वाची
तुझिया मृदु चाहूल
मम हृदयीं उल्लासाचे
नकळत घुमती सूर !

त्या इवल्या डोळ्यांत तुझ्या
अस्फुट, तरल छटांनीं
स्नेह बसे गुम्फित अपुली
मधुर स्वप्न-कहाणी !–

नीरव भाव तिच्यांतिल तो
माझा मज आकळतो;
अनुभूती नव ये कांहीं
जीव मुदें गाहिंवरतो.

आणिक मग हृदयास मिळे
अपूर्व कांहिं दिलासा—
उदासता विरते, होती
पुलकित अवघ्या आशा !

—नित्यापरि आलास न तूं
तर होतें चुकलेंसें
हुरहुर....खन्त, अकारण अन्
सुटती दीर्घ उसासे !

स्नेहाची अपुल्या न कळे
काय असे ही किमया ?
भाव-निबन्धन हें कुठलें !
कुठली ही मधु-माया !

—गत जन्मांतिल का अपुली
ओळख कांहीं होती ?
की जवळीक नवी आतां
पुढल्या जन्मासाठीं ?

## सूर्यफुलापरि–

सूर्यफुलापरि जीवितकक्षा निश्चित अपुली झाली हो !
मृत्युञ्जय त्या स्वप्नावर सुख-दुःखें उधळुन दिधलीं हो !

अपुलें अवघें अर्पित जीवन !
कर्तृत्वानें स्फुरतो कणकण
श्रद्धा अपुले अजिङ्क्य –अपुले निःश्वासहि बलशाली हो !

धगधगत्या आकाङ्क्षा उधळित
रम्य भविष्यें नयनीं उजळित
विजिगीषा निज प्रलय-घनांपरि गर्जत मन्त्र निघाली हो !

वाण घेतलें हें सत्यास्तव
घुमवित राहो उर हा गौरव
खुशाल दुनिया दीड-वितीची करो, करील टवाळी हो

तो सोन्याचा दिवस उगवतां–
यज्ञाची होऊन साङ्गता
स्फुरतिल दिव्यें चिर-वाञ्छित–मग नवलाची दीपावलि हो !

–उठा सख्यांनो ! तमा कशाची ?
करूं ओजस्वी ‘ उद्यां ’ जगाची
या श्रेयास्तव मरण लेखिलें आपण अपुल्या भाळीं हो !
सूर्यफुलापरि जीवित-कक्षा निश्चित अपुली झाली हो !

# रे स्वछन्द मना !

माझिया रे स्वच्छन्द मना !

सौन्दर्यं बघतां लवथवतीं
लक्ष ज्योति तव मन्दिरिं फुलती
प्रकाश-लहरी गुम्फित बसती चिरसुन्दर कवना.

दुबळ्यास्तव बल तुझिया गांठीं
क्षमा जागते चुकल्यांसाठीं
व्याकुळतेच्या आंसवांत नित मिसळे तव करुणा !

उदात्ततेचें घडतां दर्शन
विनम्रता ये तव ओथम्बुन
परवल तुझिया पराक्रमाचा : उत्कट, भव्यपणा !

सत्य-सख्या, तूं सदैव अपुलें
सत्वरक्षणीं शस्त्र परजलें
नित्य सज्ज तूं अन्यायाचा भङ्गायास कणा.

—निज सामर्थ्यं ज्ञात तुला तर !
घालिशील गगनासहि पांखर
तूं सहजीं अपुल्या श्रद्धेवर जिङ्किशील मरणा !
माझिया रे स्वच्छन्द मना !

## बन्द दालनें.

कितीक वरुषें उलटुनि गेलीं
अजुनि मनाचीं बन्द दालनें !
उग्र दर्प रेलून पेङ्गतो
आंत धुळीवर !
बाजूच्या या कोपऱ्यामधें
खिन्न, अधोमुख निवान्तता ही
विणीत बसली अपुलें जाळें
सन्थपणानें !
अन्धाराच्या पदरांतुन ही
उदासतेची जीर्ण कलाबतु गुम्फुनि देते !

दिवस सम्पले,
मासहि गेले,
वर्षें सरलीं
तिची कृती परि अविरत चाले
सन्थपणानें !
व्यत्यय येतो क्वचित् कधींतरि–
फडफड करितें क्षणभर वाघुळ !
क्षणभर अपुलें कार्य थाम्बवुन
निवान्तता मग वरतीं बघते
खिळवुन अपुली शून्य नजर त्या वाघळावरी–
गोठुन जाते फडफड त्याची !
पुनश्च आणिक फिरूं लागती
निवान्ततेचीं धूसर बोटें
अन्धाराच्या पदरांमधुनी
उदासतेचे गुम्फित धागे
सन्थपणानें !
उबट दर्प तो–
तसाच रेलुन पेङ्गत असतो
दाट धुळीवर !
–कितीक वरुषें उलटुनि गेलीं
मात्र अजुन हीं बन्द दालनें !

# ३० जानेवारी १९४८.

निज हृदय-रसांनीं ज्या नित अभिषेकावें
ज्यावरती अवघे मृदु हृद्भाव वहावे
त्याच्यावर धजला निर्दय वार कराया—
तो मानव—आणिक माणसेंच आम्हीही
ज्या माणुसकीची लाज न उरली कांहीं !

घेउनिया उज्ज्वल स्वप्न विशाल, उराशीं
झटलास कराया सन्तत तें अविनाशी
रे शान्तिदूत, तव असीम निष्ठा, आशा—
त्याकरितां जीवन—त्यासाठिंच मृत्यूही
फिरवील मरण हें अमरपणाची द्वाही !

तव वदनावरचें स्मित केंव्हांहि न ढळलें
नित भाव दयेचे नयनांतुन खळखळले
गे क्षमाशीलते ! अखेरचा क्षण येतां—
तव कणाकणांतुन असेल घुमली वाणी:
" रे प्रभो ! क्षमा कर यांना ! हे अज्ञानी ! "

—अन्याय जगांतिल युगानुयुग साहून,
कारुण्य जगांतिल युगानुयुग पाहून,
निज अशरणतेनें ऊर जिचा गहिंवरला—
त्या मानवतेच्या नयनांतिल तूं आंसू !
रे, भुतेंच केवळ आम्ही रक्त-पिपासु !

## बान्ध केव्हां फुटणार ?

फडफडे उद्वेगून
पुसे मन वारंवार
' कोण्डल्या या जीवनाचा
बान्ध केव्हां फुटणार ? '

शक्ति लागली पणास
झाली देहाची चाळण !
झुन्ज चाललीच तरी–
–मुक्ति दूरच अजून !....

' कोण्डल्या या जीवनाचा
बान्ध केव्हां फुटणार ? '
काय साङ्गूं माझ्या मना ?
काय देऊं मी उत्तर ?

याच जाळत्या प्रश्नाचा
नित्य करून आक्रोश
मज झुन्जव, जागव
–येवो यश, अपयश !

## मीहि न कां झुंजार ?

जीवनिं जे नित लढले
रक्षणिं मानव्याच्या
आळविल्या नित ज्यांनीं
मुक्तीच्या दिव्य ऋचा
    त्यांच्या जीवन-गाथा
    वाचुनिया कधिं बघतां
नत होई मस्तक अन्
उर येतें गहिंवरुनी.

वदतें मग आंत कुणी,
" क्षुद्र किती तव अन्तर !
तूं तुझ्यांत गुन्तुनिया
मानिसि हा भव दुस्तर.
    स्वार्थाच्या वाटेवर
    नित्य पडे तव पाऊल
या वीरांपरि केव्हां
होशिल झुंजार सख्या ? "

उत्तर ये तों कुढुनी,
" मीहि न कां झुआर ?
जीवन नच माझें हें
पुष्पापरि सुकुमार !
        विपदांशीं नित्य नच्या
        झुंजतसे ही काया
रोजच हो मजसाठीं
चिन्तांची शरशय्या ! "

—परि होतें स्वस्थ न मन
आंत खुपे सल कांहीं :
" त्यांच्यापरि नच कां हो,
मृत्युंजय मग मीहि ? "
        उर जातें काहूरुनि
        जाणवतें तों आंतुनि :
" दुसऱ्यास्तव लढले ते
झुंजत मी मजसाठीं ! "

# अन्तरींच्या स्वप्नपुष्पा !

अन्तरींच्या स्वप्नपुष्पा ! रूप तूझें पाहुं दे !
त्या तुझ्या लावण्य-जालीं बद्ध मातें होउं दे !

सौम्य तुझ्या चाहुलीचा स्पर्श या होतां उरा
लाख चन्द्रांची प्रभा ओसण्डली येथें मुदें !

मोहना रे, तों सुगन्धी धाडिले सन्देश तूं
खिन्न आकाङ्क्षांवरी ये तेज त्यांच्या सौहृदें

तूं अतां येणार ! केला स्वागताचा सोहळा
त्या उद्यांच्या उत्सवाच्या गुङ्ग मी झालों मदें

—यायची केव्हां 'उद्यां ती '? वाट्ुली पाहूं किती ?
शीण दाटे नेत्रीं, तूझ्या दर्शनें तो जाउं दे !

अन्तरींच्या स्वप्न-पुष्पा, ये क्षणीं ये धांवुनी—
स्पर्शनें साफल्य आतां या जिण्याला लाभुं दे !

माझिया वृत्तींवरी अन् माझिया शक्तींवरी
थोर सम्राटा ! यशस्वी राज्य तूझें गाजुं दे !

श्वास तूझे गूढ कांहीं गुम्फिती जें गाथन
शब्द त्याचे, अर्थ त्याचा पूर्णतेनें जाणुं दे !

—आणि गानीं त्या तुझ्या ओतूनिया माझा स्वर
एकता होतां —कहाणी या जिवाची सम्पुं दे !

## पूर्तता.

जाहलें स्वप्न आज साकार !
नित सञ्जीवक झाला ज्याचा अस्फुट साक्षात्कार
जाहलें स्वप्न आज साकार !

देवापरि जें हृदयीं धरिलें
नव आशांनीं ज्यास पूजिलें
हृदय-रसाच्या अभिषेकाची ज्यावर धरिली धार.

क्षणिं फेनापरि मळभ वितळलें
अवचित शशिसम बिम्ब उजळलें
उन्मेषांनीं बहरुन आलें हृदयाचें प्राकार.

सम्भ्रम-घन अवघे ओसरले
सङ्गर, वादळ, ताण्डव सरलें
क्षणांत एका मूक जाहले शङ्कांचे घूत्कार !

भविष्य माझ्या मुठींत येथुन
करीन सुखमय सहजीं त्रिभुवन
विक्रम-वैभव-विजयाला हो सदैव मुक्त-द्वार.

नव सञ्जीवन जीवनिं आतां—
ऊठ मना, सिद्ध हो स्वागता
या चिरसुन्दर सत्याचा कर अखण्ड जयजयकार !
जाहलें स्वप्न आज साकार !

## हे स्वप्नांचे पाश !

तोडूनिहि तुटती नच हे–
हे स्वप्नांचे पाश
दृढ, नाजुक अनुबन्धांनीं
वेढिति अजुन जिवास
सारूनिहि सरते न दुरी
त्यांची काञ्चन-माया
सम्मोहन अस्त्रें त्यांचीं
गेलीं न अजुनी वायां ?

—नुहतीं तीं स्वप्नें-आतां
ये पुरतें उमजून—
स्वप्नाळूपण या हृदयीं
गेलें राज्य करून !
अजुनिहि परि हें मन वेडें
घोटाळुन त्याभंवतें
बघुन भग्न आरास अशी
नित अपुल्याशीं झुरतें !

—जाळित ये आतां श्रम हा
मम जीवानें वास्तवते !
ये उघळित अवतीं-भंवतीं
नग्न तुझीं तीं सत्यें !
तरवारीपरि लखलखतीं
तीक्ष्ण तयांचीं पातीं
क्षणांत जातिल हृदयाची
विरविरत दुबळीं नातीं—

कठोरता ही मज त्यांची
सजीवक होईल
दृष्टि नवी येईल, मना—
पंख नवे फुटतील
अन् माझ्या हळव्या उरिंही
स्फुरतिल नव सामर्थ्यें
आणिं ओसण्डुनि जाइल हें
जीवित नूतन अर्थें !

अनुक्रमांक २५५७३
विभाग क्र. १५४
क्रमांक ७३८३
नों. दि. २५।८।५४

# मागोवा.

स्वप्नांच्या दुनियेमधिं आजवरी रमलेलें
मन माझें येइ आज
घेत घेत मागोवा
सत्याच्या विश्वाचा !
—तुटले ते पूर्वीचे पाश, तरी
तुटतांना करकचून वठलेले वळ अजुनी
वागवीत साङ्गातीं !

दबकत शिरतां आणिक
सत्याच्या जगतामधिं
बावरतें, गोन्धळतें
बिचकुन कधिं अडखळतें
विस्मित केव्हां होतें
दिपतें हो, दिपतें हें मन माझें !

परिचित होती त्याला बांसरिची मञ्जुलता
ललनांच्या कण्ठांतिल मोहकपण नवलाचें
प्रणयोत्सुक विहगांचें मधु गुञ्जन–
–पारि हें आर्त क्रन्दन
शोकाची आरोळी
जळजळत्या दुःखाची ही ठिणगी
नव्हती गेली त्याला कधिंही जाळुन-पोळुन–
येतां हा अनुभव नव आज असा
दचकुनिया अडखळतें
रडतें हो, रडतें हें मन माझें !

माहित होती त्याला
भावगूढ गीतापरि
उत्कट सौन्दर्यानें ओथम्बुन आलेली
चान्दरात,
फुलती वासन्त उषा,
विव्हल रमणीपरि ती करुण-रम्य
खिन्न साञ्ज–
–परि चढत्या ग्रीष्मांतिल ही दुपार
अग्नीचें करुन उसें
ज्वालांच्या शय्येवर
तडफडते, तळमळते....

—आजच होतां हिजशीं परिचय नव
सुस्कारुन फडफडतें
कढतें हो, कढतें हें मन माझें !

ज्ञात तयाला होते
मोगरिचे श्वास धुन्द
बकुळीचा मृदु परिमळ
मादक हिरवा चांफा
प्रमदांचीं निःश्वसितें—त्यांतिल तें गन्ध नृत्य—
—परि हा दिनभर शिणल्या
देहाच्या घामाचा दर्प उग्र
वेढित येतां त्याला
उद्वेगुन बावरतें
गुदमरतें आंत आंत मन माझें !

—सावध रे, सावध हो खिन्न मना !
सत्याच्या विश्वाचें हें तर पहिलें दर्शन—
बावरून, गोन्धळून
स्वप्नांच्या भूमिकडे वळवुं नको मुख फिरुनी—
जा असाच
घेत घेत मागोवा
सत्याच्या विश्वाचा.
येतां नूतन दृष्टि
स्फुरतां नूतन शक्ति
अनुभव येइल तुजला त्या शाश्वत सत्याचा—
साक्षात् सौन्दर्याचा
अन् अथाङ्ग शान्तीनें ओसण्डुन होइल रे,
जीवन तव सार्थ, पूर्ण.

## सत्य आज ये घरीं !

सत्य आज ये घरीं !
स्वप्नाहूनिहि अभिनव, उज्ज्वल सत्य आज ये घरीं !

कधिं झुळुकेवर येउन तरळत
दरवळ गेला सुखवुन जीवित
स्वर्ग-सम्पदा आज वर्षतो पारिजात हांसरी.

निरञ्जनांतील ज्योत एकली
स्वप्न-भूमि मम उजळुन गेली
सहस्रकिरणीं प्रत्यक्षामधिं रवि तम हें संहरी.

बांसरिचा स्वर कधिं मधु, मोहन
ओसरला क्षणभर रेङ्गाळुन
विश्वगायनें ग्रहगोलांचीं घुमतीं आतां उरीं.

प्रीतीची कधिं लागुन चाहुल
क्षण झालें मन आतुर, आकुल
प्रीति-देवि पूजितें आतां तर मज निज हृन्मन्दिरीं.

सत्याचें हें मनोज्ञ दर्शन–
कृतार्थतेनें फुललें जीवन !
नवल !—तरीरी हुरहुर कसली आर्त सलत अन्तरीं ? :

–सत्यच कां हें असें खरोखर ?
स्वप्न हेंहि वा विशाल, सुन्दर ?
आभासाची वा सत्याची दुनिया ही साजिरी ?
स्वप्नाहूनिहि अभिनव, उज्ज्वल सत्य आज ये घरीं !

# सत्यांनो !

आलों अखेर सत्यांनो आज तुम्हांपाशीं.

ओतुनीया स्नेहकळा
एक एक उजळला–
मालवून स्वप्न-दीप स्वहस्तें अधेशीं

पूजिली मीं भग्न-मूर्ति
येतां उमजून चित्तीं
प्रसाद-पुष्पांच्या पायीं तुडविल्या राशी

पालटली दृष्टि आतां
उघडली नवी गाथा
जागवीत शब्द, ओळ, गीत मर्मस्पर्शी

भिन्न स्वरूपीं तुमच्या
घुमे एकतेची ऋचा
लागून त्या मङ्गलेची चाहूल जराशी

शाश्वताचें दिव्य तेज
डोळां पाहियेलें आज
विरत निःश्वास माझा पूर्णतेच्या श्वासीं
आलों अखेर सत्यांनो ! आज तुम्हांपाशीं !

## उष्टावतां पान–

उष्टावतां पान येऊन दाराशीं
आक्रन्दले कोणी उपाशी-तापाशीं,
घांसही न त्यांना वाढला परन्तु
अहो, असला मी स्वार्थसाधु जन्तु !
–आज वणवण भटकतों कोठें–
मायेनें कशाला वाढतां हीं ताटें ?
पश्चात्तापानें हें हृदय कढूं द्या !
मजला रडूं द्या ! मजला रडूं द्या !

निराधार कोणी आसऱ्याला आले
" ओटीशी पथारी– पसरूं ? " म्हणाले–
माघांतली थण्डी कडाडे बाहेर
परि न तयां मीं दिधला आधार !
–मीच आज जातां असा कांकडून
घालतां मायेचें केविं पाङ्घरूण ?
थण्डीवाऱ्यांतच देह हा पडूं द्या !
मजला रडूं द्या ! मजला रडूं द्या !

आले उम्बऱ्याशीं पीडित-दुबळे
दुःखानें न त्यांच्या ओलावले डोळे
आर्तस्वर त्यांचे रिघले कानांत–
परि कालवून आलें न पोटांत !
–दुःखी मीच आज शिरावर पाप !
लावितां उरीं कां मज मायबाप ?
डोळयांतून आंसूं असेच सांण्डूं द्या !
मजला रडूं द्या ! मजला रडूं द्या !

## ईश्वराचें मनोगत.

चिरविरही मी ! मी चिरमीलित !

नवपर्णांतुन मीच विलसतों
मुग्ध कळ्यांमधिं मी दरवळतों
बाल-मुखीं स्मित–मीच तरळतों
युगायुगांतुन कृपा-कटाक्षें फुलवित आलों मी नवजीवित.

समृद्धी मी धनधान्यांतिल
ऋद्धि-सिद्धि मम परिजन केवळ
विश्वचक्र मम वलय करांतिल
मानसलहरीवरि माझ्या नित जगताची स्थिति राहि तरङ्गत.

क्षुब्ध सागरीं मीच रुद्रपण
ज्वालामुखिंतुन उठतों उसळुन
सङ्ग्रामांतिल मी लय दारुण
कडकडतां घन-मृदङ्ग, येतों प्रलय-ताण्डवीं नाचत-गर्जत !

भूत माझिया चरणाखालीं
वर्तमान विहरतो करतलीं
भविष्य-चित्रें सकल उजळलीं–
नेत्रीं माझिया, त्रिकालशास्ता मी, मम शासन पूर्ण, अबाधित.

सञ्जीवक मी – मी संहारक
तेज, दीप्ति मी – तिमिर भयानक
सुमनीं कोमल – अनलीं दाहक
कठोर-कोमल शब्दांतुन मी विविधपरींनीं नटलों शाश्वत !

अणु-अणु मी व्यापुनिया उरलों
तरि न कुणाला अजुनि गवसलों
अद्वैतुन साकार जाहलों–
सत्यरूप मम मात्र वेगळें – नच माझें मजलाही अवगत !

–मात्र दया उरीं अथाङ्ग भरली
'जिवा' 'शिवा' ची करित साउली,
विभूति मम युगयुगें राहिली–
परि न कुणाची मायापांखर मज,–ही हुरहुर कुणास माहित ?
चिरविरही मी ! मी चिरमीलित !

# प्रिय गगना !

प्रिय गगना, मी सदैव आतुर तुझिया शुभ दर्शना

बघतां तुजला साञ्ज-सकाळीं
अन्धपणाची जळुनी जाळीं
तेजाची हृदयांत सुरू हो उज्ज्वल आराधना !

अनन्त हस्तें उधळित जीवन
ताण्डव भैरव करित कडाडुन
रुद्रपणीं त्या नव जन्माची कधिं घुमविसि घोषणा

जरतारी ज्योत्स्नेचें मोहन—
घेउन, वेधित मदनाचें मन
करिसि कधीं तूं स्निग्ध सुखाची गूढ मधुर वर्षणा

दंशुनि जातां कधीं अनावर
अवमानाचे भीषण अजगर
तव सहवासीं शीतल, सुखकर लाभे अभिमन्त्रणा !

उत्तर-रात्रीं कधिं ताऱ्यांतुन
प्रभुचें अस्फुट रूप दाखवुन
वितरिसि या उरिं तव नीलापरि अथाङ्ग, मृदु सान्त्वना.

सख्या मोहना, तुझा जिव्हाळा
गाहिंवरवी, विरघळवि जिवाला
स्नेहाची मम अबोल तुज ही कळेल ना भावना ?
प्रिय गगना ! मी सदैव आतुर तुझिया शुभ दर्शना.

# या माझ्या शब्दांत—

या माझ्या शब्दांत साण्डते
अंतरांतली दाहक जळजळ
खळखळ करुनी स्फुन्दत जाई
मूक आंसवांचा कधिं ओहळ

कधीं लवलवती वीज सुखाची
हृदयांतुन कळ उठवुन जाई
नवलपरीची क्षणिक झळक ती—
नित शब्दांतुन तेवत राही !

सौन्दर्याच्या सङ्गतींत कधिं
उत्कटतेची चढता धुन्दी
शब्द वेंचती चुकले-मुकले
त्यांतिल ते रस—रङ्ग सुगन्धी.

नित्याच्या या संघर्षांतुन
उमजे मजला अणु-अणु जीवित
अर्थ तयाचा प्राशुन येतां
शब्दांनो, तुम्हि उमलत, उजळत !

त्या अर्थांतुन साफल्याची
नवीच ये जाणीव झळाळत,
तुम्हीच करितां तिला चिरन्तन.
—असा जिव्हाळा अपुला शाश्वत.

## उर्मिले !

फिरून फिरून
मुरडून मागें बघसी कासया
बाळे उर्मिले,
आणि आंसवांनीं भरसी पापणी
सुख-दुःखांच्या ?
वारंवार तुझें पाऊल अडतें
मन घोंटाळतें
कालवून येतें
आणि फिरते दृष्टि भिरभिरि
अवतीं-भोंवतीं.
माझिया उर्मिले,
सोडून माझें हें इवलें घरटें
निघालीस आज
आपुल्या जगांत—
क्षणीं या अशीच व्हायची बाळे,
उरीं घालमेल !

[ कसें तुज साङ्गू–
काय काय होतें हृदयीं माझ्या ! ]
ठाऊक तुजला
तूंच माझी मैत्री, माझी वत्सलता
भावनोत्कटता,
सौन्दर्यदृष्टि,
अमृत-जेतें सामर्थ्य माझें
अवघें तूंच !
माझ्या हृदयींच्या उर्मीउर्मीतून
आलीस लेऊन जीवन-नव्हाळी.

–पडतां पाऊल आजला तुझें घरट्याबाहेर
वर्तमान येई करीत मजला
मधुर दंश !
तुझ्या बालवयीं
रेखिली मीं नित्य चित्रमाला तुझ्या
यौवनदशेची–
आणि आज या उम्बऱ्यावरून
वळून मागें
खेळूं पाहे मन
तुझ्या त्या अल्लड, कोवळ्या क्रीडांशीं !
बाळे उर्मिले,
तुझ्या सङ्गतींत
राहिलाच नाहीं
मज ताळमेळ काळवेळाचा !

परन्तु बाळे,
तुजहा पडे कां भूत-भविष्याची–
वर्तमानाची भूल अशीच ?

माझ्यापरीच भाम्बावून तूंही
विसरली कसें
सारें–सारें कांहीं !
–तुजला बघतां
भूतकालाचें वृद्ध मस्तकही
उञ्चावतें पुन्हां अभिमानानें !
वर्तमान तर धन्य धन्य झाला
तुझीं हळदीचीं पडतां पाउलें
त्याचिया वक्षीं !
केव्हांच निघाला तुझिया स्वागता भविष्यकाल
कोवळया उन्हाचे अन्तरींत सडे
अवतीं-भंवतीं
उधळीत मुक्त कस्तुरीचा गन्ध
तुझ्या गौरवाची गात, आलापीत
'जयजयवन्ती'
घेऊन आदरें नजराणे तुज
उज्ज्वल श्रेयांचे !
लाडके उर्मिले,
कशास मग हीं आंसवें डोळां ?
निःशङ्क मनानें आपुलें पाऊल
अडखळतें
टाक पुढती–
होईल अवघें मङ्गल, मङ्गल
कल्याणमय !
–देतसे ग्वाही
माझें 'पापशङ्की' मनही आंतून
नाहीं–नाहींच व्हायची उपेक्षा
तुझी कधींच त्या बन्धु-लक्ष्मणाच्या
उर्मिलेपरी.

माझ्या लडिवाळे,
बघ हे आतां मीं पुसले डोळे
तुझे [ नि माझे ]–
–फिरून फिरून नकोस भरूं
अश्रूंनीं पापणी–
नकोस बघूं मुरडून मागें,
अडखळतें
भाग्याचें पाऊल
टाक पुढती निःशङ्कपणें,
पुढती सारेंच कल्याणमय–
मङ्गल, मङ्गल !

टीपा-

'उज्ज्वला' हा माझा पहिला कवितासंग्रह जरी १९४५ मध्यें प्रकाशित झालेला असला,तरी त्यांत केवळ १९४३ पर्यंतच्याच कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्या नंतरच्या गेल्या १० वर्षांतील निवडक कविता या संग्रहांत समाविष्ट केल्या आहेत. पुढील टीपांतील निर्देश कवितेचें नांव, वृत्त-जाति-छंद, रचनास्थळ व रचनाकाल अशा क्रमानें केलेले आहेत.

अनुक्रम ..........
विषय ..........
क्रां
नों. दि.
ग्रंथालय शाखा

| | |
|---|---|
| १ आलं उम्बराला फूल | छन्द: स्मर, नाशिक, २९:१२:४३. |
| २ नवलाची पहांट | जाति : श्यामाराणी, धारवाड २६:२:४८. |
| ३ वर्षा | मुक्तच्छन्द, नाशिक, जुलै १९४६. |
| ४ कृतज्ञ | जाति : सृष्टिलता, धारवाड ५:३:४८. |
| ५ स्नेह मी जागवीन आपुला | जाति : सूर्यकान्त, धारवाड, १८:२:४९. |
| ६ या दिनान्तीं | वृत्त : व्योमगङ्गा, धारवाड, २०:४:५०. |
| ७ भररस्त्यावर | छन्द : षडक्षरी, धारवाड, १:११:४९, |
| ८ माझिया भोंवतीं | मुक्तच्छन्द, धारवाड, १७:४:५०. |
| ९ डोळे तुझे बदामी | जाति : रसना, नाशिक, २८:१२:४३. |
| १० सल | छन्द : ओवी–देवीवर, नाशिक, १९४३. |
| ११ अधुरें गीत | जाति : वल्लभा, नाशिक, ७:९:४६. |
| १२ प्रीतीच्या पांखरा | मुक्तच्छन्द, नाशिक, ९:५:४५, |
| १३ उशीर | जाति : भूपति, धारवाड, १६:१०:४८. |
| १४ नवें प्रलोभन | जाति : पादाकुलक, नाशिक, २८:११:४९ |

| | | |
|---|---|---|
| १५ | ओळख | जाति : भूपति, धारवाड, २५:८:४७. |
| १६ | अडसर | जाति : पतितपावन, बेळगांव, ५:१२:५२. |
| १७ | मूक प्रीत ही | छन्द : ओवी–देवीवर, नाशिक, ११:६:४७ |
| १८ | नांव | जाति : लीलारति, धारवाड, १:१०:४९. |
| १९ | व्यथा मनांतिल | जाति : पादाकुलक, धारवाड, ५:६:५०. |
| २० | मुका मार | छन्द : ओवी–देवीवर, बेळगांव, ६:१२:५२ |
| २१ | रहस्य | जाति : लीलारति, धारवाड, २६:८:५०. |
| २२ | अजूनहि कधीं | मुक्तच्छन्द, धारवाड, १४:९:५०. |
| २३ | चूक | जाति : पादाकुलक, बेळगांव, ९:१०:५१. |
| २४ | त्या निवान्त रस्त्यावरती | मात्रिक मुक्तच्छन्द, बेळगांव, ८:१०:५२. |
| २५ | या ताराङ्कित | जाति : कर्णफुल [ – । प । – – – ] बेळगांव, १०:८:५१. |
| २६ | तुझ्या रुसण्याची रीत | छन्द : ओवी–देवीवर, बेळगांव, २४:९:'१३ |
| २७ | या विश्वसागरावर | जाति : भूपति, नाशिक, १९४६. |
| २८ | तुझ्या हास्यांतून | मुक्तच्छन्द, बेळगांव, १०:१०:५१. |
| २९ | भूल | जाति : बालानन्द, बेळगांव, १९:११.५१. |
| ३० | आसूड | छन्द : ओवी–देवीवर, धारवाड, २५:४:५० |
| ३१ | निघतांना | छन्द : ओवी–देवीवर, धारवाड, २९:४:५० |
| ३२ | संहारचक्र | जाति : भूपति, बेळगांव, १४:७:५१. |
| ३३ | सिध्द व्हायचें हांसून | छन्द : ओवी–देवीवर, नाशिक, १२:८:४४. |
| ३४ | हें सौन्दर्य | जाति : भूपति, धारवाड, ३१:१०:४८. |
| ३५ | नियति | जाति : लीलारति, धारवाड, ९:१०:४९. |
| ३६ | जीवन ! जीवन ! | जाति : पादाकुलक, धारवाड, ४:३:४८. |
| ३७ | माझें बकुळीचें जग | छन्द : ओवी–देवीवर, धारवाड, १५:८:४९ |
| ३८ | मत्स्यावतार | मुक्तच्छन्द, धारवाड, २:३:५० |
| ३९ | भूपाळी | छन्द : षडक्षरी, धारवाड, ६:४:५०. |
| ४० | दुपार | जाति : पतितपावन, अन्त्य अकार निभृत, तसा तो न समजल्यास, जाति : लवङ्गलता होईल. धारवाड, १८:४:५०. |

| | |
|---|---|
| ४१ ओसरलें वादळ | छन्द : सप्ताक्षरी, नाशिक, १९४६. |
| ४२ पावसाळी हवा | शार्दूलविक्रीडित–सुनीत, धारवाड, ५:१०:४२. |
| ४३ कातरवेळस | जाति : पादाकुलक, धारवाड, २०:६:५०. |
| ४४ कळ | जाति : श्यामाराणी, धारवाड, १४:२:४८. |
| ४५ सांज | जाति : राजेश्वरी, नाशिक, १६:५:४४. |
| ४६ वाट | जाति : पादाकुलक, धारवाड, ११:९:५०. |
| ४७ प्रक्षुब्ध गर्जतो | जाति : भूपति, नाशिक, १९४६. |
| ४८ गुपित | जाति : अरुण, धारवाड, १७:२:५१. |
| ४९ मोगरा | मात्रिक मुक्त-छन्द, बेळगांव, १६:११:५१ |
| ५० पांखरा ! | जाति : दयिता, नाशिक, १४:१:४६. |
| ५१ सूर्यफुलापरि | जाति : श्यामाराणी, धारवाड, ९:८:४८. |
| ५२ रे स्वच्छन्द मना ! | जाति : अञ्जनी, धारवाड, ७:१०:४९. |
| ५३ बन्द दालनें | मात्रिक मुक्त-छन्द, धारवाड, १५:८:४९. |
| ५४ ३० जानेवारी १९४८ | जाति : भूपति, धारवाड, २:२:४८. |
| ५५ बान्ध केव्हां फुटणार | छन्द : ओवी–देवद्वार, धारवाड, १८:१०:४२ |
| ५६ मीहि न कां झुञ्जार ? | जाति : जीवन-लहरी, नाशिक, २३:६:४६. |
| ५७ अन्तरींच्या स्वप्नपुष्पा | वृत्त : देवप्रिया, धारवाड, १३:२:४८. |
| ५८ पूर्तता | जाति : अञ्जनी, चरणान्त्य अकार निभृत. नाशिक, १:५:४५. |
| ५९ हे स्वप्नांचे पाश | जाति : दयिता, धारवाड, १,११:४८. |
| ६० मागोवा | मात्रिक मुक्तछन्द, धारवाड, ३:११:४९. |
| ६१ सत्य आज ये घरीं | जाति : सृष्टिलता, पुणें, २:३:४६. |
| ६२ सत्यांनो ! | छन्द : समर, धारवाड, १७:१०:४९. |
| ६३ उलटावतां पान | छन्द : षडक्षरी, नाशिक, १६:८:४६. |
| ६४ प्रिय गगना ! | जाति : सृष्टिलता, धारवाड, ६:३:४८. |
| ६५ ईश्वराचें मनोगत | जाति : पादाकुलक, नाशिक, २:९:४६. |
| ६६ या माझ्या शब्दांत | जाति : पादाकुलक, धारवाड, ३:८:५०. |
| ६७ उर्मिले ! | मुक्तछन्द, धारवाड, १९:१०:४९. |

REFBK-0008369
REFBK-0008369

# शुद्धता

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | १२ | दरवळून् | दरवळत्रून् |
| ५ | २१ | पुजूं | पूजूं |
| १५ | ९ | आतां | अतां |
| ४६ | २५ | उज्वल | उज्ज्वल |
| ५३ | ६ | येईल | येइल |
| ६० | २ | करुं | करूं |
| ६० | १४ | याच्याच | याच्या |
| ६० | १८ | करुं | करूं |
| ८८ | १ | साङगू | साङगूं |
| ८८ | २६ | तुजहा | तुजही |

दा. क. ८३९४

९६